# Good Work Of Nagpur Rural Police

## नागपूर (ग्रामीण) पोलीस अधिक्षक कार्यालय व पोलीस मुख्यालय येथे आयोजीत 'आरोग्य तपासणी शिबीर' संपन्न

दिनांक १७/११/२०१६ रोजी नागपूर (ग्रामीण) पोलीस अधिक्षक कार्यालयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी आणि मंत्रालयीन स्टाफ तसेच दिनांक १८/११/२०१६ रोजी सकाळी १०.०० वा. च्या सुमारास ग्रामिण पोलीस मुख्यालय व मोटर परिवहन विभाग येथील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता **'आरोग्य तपासणी शिबीराचे'** आयोजन नागपूर (ग्रामीण) पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे व अपर पोलीस अधिक्षक श्री. नरसिंग शेरखाने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आले होते. सदर आरोग्य तपासणी शिबीर हे नागपूर ग्रामिण पोलीसदल, नागपूर महानगरपालिका तसेच **व्होक्हार्ट हॉस्पीटल, नागपूर** यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले होते.

या आरोग्य तपासणी शिबीरामध्ये व्होक्हार्ट हॉस्पीटलचे, डॉ. सोनलकुमार भगत, डॉ. मयुरेश लोकासी, डॉ. अमोल गहुकर, डॉ. सचिन लिंगोट, डॉ. प्रशांत शिरसाट आणि भावना अवचट (नर्स), क्रिष्णा गोपाल किरार व नागपूर महानगरपालिका यांच्या तर्फे डॉ. श्रीमती शिल्पा जिचकार, डॉ. मिनाक्षी माने, बालरोग तज्ञ डॉ. अभय केतकर, आयुर्वेदिक तज्ञ डॉ. वैष्णवी केतकर आणि डॉक्टरांच्या तपासणी पथकातील श्रीमती. कुंदा बुरडे (नर्स), श्रीमती. शाहीस्ता परविन, आरती गायकवाड, रजनी मेश्राम, ईश्वर चहांदे आणि पोलीस मुख्यालय नागपूर (ग्रामिण) शासकीय रूग्णालयातील डॉ. माधुरी कुचेकर आणि वैशाली सलगंटवार, प्रांजय वैद्य, दिलीप आमीलवार, मोहन नागपूरे यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच त्यांच्या कुंटुबियाची ई.सी.जी., ब्लड शुगर, ब्लड प्रेशर, हिमोग्लोबिन, रक्तगट, नाक, कान, घसा आणि डोळयांची तपासणी इत्यादी रोगांची तपासणी करुन घेतली. तसेच तपासणी नंतर निशुल्क औषधीचे वितरणही करण्यात आले.

या शिबीरामध्ये रोगांची तपासणी केल्यानंतर, सहभाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तींना योग्य ते मार्गदर्शनही करण्यात आले. या शिबीरामध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच त्यांच्या कुंटुबियाने उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. या आरोग्य तपासणी शिबीरामध्ये एकूण ३५० पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली. नागपूर (ग्रामीण), पोलीसांच्या वतीने सदर शिबीराचे मानव संसाधन व कल्याण शाखेचे सहा. पो.नि. श्रीमती वर्षा वंजारी, पोहवा श्री. सैय्यद असई, श्री. संतोष हिवरकर, पोशि. डार्विन शेंडे, सत्यशील कोठारे, मपोशि. लिना लोंदे, ज्योती पवार, यांनी अथक परिश्रम करुन कार्यक्रम यशस्वी केला.









